**कृपया प्रसिद्धीसाठी** **9 मार्च 2012**

## मुंबईतील मतदार याद्या सुधारण्याचे
## केंद्रीय निवडणूक आयुक्तांचे भाजपा नेत्यांना आश्वासन

**नवी दिल्ली, शुक्रवार :** मुंबईतील मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुबार मतदार असल्याचे मान्य करुन त्या सुधारण्याचे आश्वासन भारत सरकारचे निवडणूक आयुक्त डॉ. एस. वाय. कुरेशी यांनी आज नवी दिल्लीत भाजपा नेत्यांना दिले. माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक, खासदार श्री. बाळ आपटे, भाजपा केंद्रिय निवडणूक प्रकोष्ठाचे प्रमुख श्री. आर रामकृष्ण, भाजपा अखिल भारतीय अनुसूचित मोर्चाचे सरचिटणीस व मुंबईचे माजी उपमहापौर श्री. रमेश मेढेकर व महाराष्ट्र आय. टी. सेलचे संयोजक श्री. विनित गोयंका या भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या प्रतिनिधी मंडळाला देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी ''मतदार याद्या सुधारण्याचे हे काम आव्हान म्हणून आम्ही स्वीकारु'', असे सांगत हे ठोस आश्वासन दिले. या चर्चेच्यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त डॉ. एस. वाय. कुरेशी यांच्यासह निवडणूक आयुक्त सर्वश्री. व्ही. एस. संपत व एच. एस. ब्रह्मा हेही सहभागी झाले होते.

नुकत्याच झालेल्या मुंबई महानगर पालिका निवडणुकीत मतदान कमी म्हणजे 46 टक्के झाले असे मत महाराष्ट्राच्या निवडणूक आयुक्त श्रीमती नीला सत्यनारायण यांनी व्यक्त केले होते. त्यांचे हे मत चुकीचे असून दुबार मतदार व अजूनही मतदार यादीत समाविष्ट मृत मतदार यांमुळे मतदार याद्या फुगल्या आहेत. एकूण मतदार अवाजवी जास्त दिसत असल्याने मतदान कमी झाल्यासारखे वाटते, अशी माहिती देऊन श्री. राम नाईक म्हणाले, ''महाराष्ट्रातील विशेषतः मुंबईतील मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुबार मतदार आहेत. मुंबईत फार मोठ्या प्रमाणावर मतदार निवासस्थाने बदलतात, या बदलांची योग्य नोंद न घेतल्याने दुबारांचे प्रमाण वाढले आहे.'' वर्ष 2007 मध्येच हे पुराव्यानिशी निदर्शनास आणून दिले होते. त्यावेळी सादर केलेल्या आकडेवारीनुसार उत्तर मुंबईतील मालाड, कांदिवली व बोरीवली या तीन विधानसभा क्षेत्रातच 18,02,877 मतदारांपैकी 3,57,520 म्हणजे 20 टक्के दुबार मतदार आढळले होते. हा दोष दूर करण्याचे आश्वासनही त्यावेळी दिले होते. परंतु गेल्याच महिन्यात झालेल्या मुंबई महानगर पालिका निवडणुकीच्या मतदार याद्या पाहिल्यानंतर प्रत्यक्षात याद्यांमध्ये म्हणावी तशी सुधारणा न झाल्याचे आढळून आले. त्यामुळेच श्री. राम नाईक यांनी आधी राज्याच्या निवडणूक आयुक्त श्रीमती नीला सत्यनारायण यांची भेट घेतली. त्यांनीही निदान 13 लाख दुबार मतदार एकट्या मुंबईतच असल्याचे मान्य केले होते. त्याचवेळी श्री. राम नाईक यांनी केंद्रिय निवडणूक आयुक्तांकडेही प्रत्यक्ष चर्चेसाठी वेळ मागितला होता.

त्यानुसार आज नवी दिल्ली येथे देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेत्यांच्या शिष्टमंडळाशी या विषयावर चर्चा केली. मतदार याद्यांचे पावित्र्य जपायचे असले तर त्या निर्दोष असल्या पाहिजेत यावर शिष्ट मंडळाने चर्चेमध्ये भर दिला ''मुंबईच्या निर्दोष मतदार याद्या तयार करणे हे काम म्हणजे एक आव्हानच आहे. मात्र आम्ही हे आव्हान स्वीकारत असून दुबार मतदारांना वगळून मुंबईतील मतदार नव्या याद्या प्राधान्य देऊन तयार करु,'' असे स्पष्ट आश्वासन डॉ. कुरेशी यांनी यावेळी भाजपा नेत्यांना दिले.

**(कार्यालय सचिव)**